UGC Approved
Refereed Journal

Jr.No.43053

# Printing Area

International Multilingual Research Journal

**Issue-32, Vol-06, August 2017**




ISSN 2394-5303

Editor
Dr.Bapu G.Gholap

www.vidyawarta.com

Savitribai College of Arts
ID. No. PU/AN/A/ 58/1999
Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar

PRINCIPAL
Savitribai College of Arts
Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar

27) श्री संत तुकाराम महाराजांच्या प्रभावळीचे वारकरी संप्रदायातील स्थान व महत्व
प्रा. डॉ. शेटे देविदास मल्हारी, जि. अहमदनगर || 122

28) माध्यमिक स्तर पर अध्ययनरत विद्यार्थियों के समायोजन का तुलनात्मक अध्ययन
डॉ० मंजूषा अवस्थी, लखनऊ || 125

29) ग्रामीण विकास एवं गरीबी उन्मूलन मे गैर—सरकारी संगठन की भूमिका
डॉ. आयशा अहमद—डॉ. महेन्द्र शर्मा, दुर्ग (छ.ग.) || 130

30) वेदों के अर्थबोध में आचार्य यास्क का योगदान
पुष्पलता, मुज़फ्फरनगर || 132

31) रंगभूमि उपन्यास:औद्योगिक समस्या एवं सामाजिक संघर्ष
डॉ. जुगल किशोर कुजूर, जिला—सरगुजा छ०ग० || 138

32) डॉ. गिरिराजशरण अग्रवाल की ग़ज़लों में अभिव्यक्त रिश्तों की घूटन
प्रा. भगवान बाबूराव भालेराव, जिला जलगाँव (महाराष्ट्र) || 143

33) नई सदी के साहित्य में शरणार्थी विमर्श
नीता दौलतकर, धारवाड || 147

34) मानवतावादी दृष्टिकोण और भारतरत्न-डॉ. भीमराव रामजी अंबेडकर
डॉ. आर. के. जाधव, जिला धुलियाँ (महाराष्ट्र) || 149

35) हिंदी साहित्य में नारी विमर्श
प्रा. संजय प्रल्हाद महाजन, जि. जलगाँव (महाराष्ट्र) || 151

36) हिंदी भाषा का महत्व:वैश्वीकरण के विशेष परिप्रेक्ष्य में
डॉ. मनोहर हिलाल पाटील, जि. नंदूरबार (महाराष्ट्र) || 154

37) डॉ. कुँअर बेचैन की ग़ज़लों में व्यक्त सामाजिक चिंतन
प्रा. डॉ. मर्हेद्र जयपालसिंह रघुवंशी, नंदुरबार (महाराष्ट्र) || 158

38) समकालीन ग़ज़लकार कुँअर बहादुर सक्सेना की ग़ज़लों में सामाजिक संवेदना
डॉ. संजय विक्रम ढोडरे, धुले, ता. जि.-धुले || 160

39) हिन्दी दलित आत्मकथा लेखन:एक विमर्श
डॉ० सियाराम, औरैया (उ० प्र०) || 163

http://www.printingarea.blogspot.com
www.vidyawarta.com/03



Savitribai College of Arts, Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar ID. No. PU/AN/A/ 58/1999
PRINCIPAL
Savitribai College of Arts
Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar

ISSN: 2394 5303 | Impact Factor 4.002(IIJIF) | Printing Area International Research journal | August 2017 Issue-32, Vol-06 | 0122

27

# श्री संत तुकाराम महाराजांच्या प्रभावळीचे वारकरी संप्रदायातील स्थान व महत्व

**प्रा. डॉ. शेटे देविदास मल्हारी,**
मराठी विभाग प्रमुख,
सावित्रीबाई कला महाविद्यालय,
पिंपळगाव पिसा, ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर,
सा. फुले पुणे विद्यापिठ पुणे.

***********

महाराष्ट्रात यादव कालखंडापासुन अनेक पंथ उदयाला आले परंतु त्यांचे तत्वज्ञान व आचारधर्म कडक असल्यामुळे सर्व समाजापर्यंत ते पोहचले नाहीत. शके बाराशेमध्ये संत ज्ञानेश्वरांनी भागवत धर्माचा पाया घातला व सर्व समाजाला वारकरी संप्रदायाच्या माध्यमातुन भक्ती करण्याचा अधिकार गरीब-श्रीमंत, उच्च-नीच, शुद्र स्त्री-पुरुष या सर्वांना दिला. व्यवस्थेने नाकारलेली भक्तिची दारे सर्वांसाठी उघडी करुन दिली. हे प्रबोधन ज्ञानदेवांपासून तर थेट निळोबारायांपर्यंत चालु होते. संत ज्ञानेश्वर व नामदेव यांच्यापर्यंत संत एकनाथांनी ही धुरा सांभाळली. संत एकनाथांनंतर मात्र वारकरी संप्रदायातील सर्वात महत्वाचे संत तुकाराम महाराज ठरतात. संत तुकाराम महाराजांना मात्र कार्यकतृत्वाने वारकरी संप्रदायाचे कळस होण्याचे भाग्य त्यांना लाभले. वारकरी संप्रदायात त्यांनी आपल्या भक्तिचा, साहित्याचा, अभंगवाणीचा वेगळा ठसा उमटविला म्हणून आज सर्वसामान्य माणसाच्या घराघरात वारकरी व संत तुकाराम महाराजांची अभंगवाणी पोहचलेली दिसते. या सर्वांमध्ये संत तुकाराम महाराजांच्या प्रभावाखाली स्वतःहुन आलेले त्यांना गुरू मानणारे जे संत कोण होते त्यांचे महत्व काय होते या सर्वांचा परामर्श घेणे महत्वाचे आहे.

संत तुकाराम महाराजांच्या प्रभावळीचे वारकरी संप्रदायातील स्थान व महत्च विशद करताना यामध्ये संत बहिनाबाई, तुक्या बंधु कान्होबा, रामेश्वर भट वाघोलीकर, [illegible] महाराज कन्या भागुबाई, संताजी तेली जगनाडे, कचेश्वर व्रम्हे, संत निळोबाराय पिंपळनेरकर या सर्वांचा आवर्जुन उल्लेख करावा लागतो. या सर्वांच्या रचनेकडे पाहिल्यानंतर संत तुकाराम महाराजांच्या विचारांचा प्रभाव पडलेला दिसुन येतो. ससंत तुकाराम महाराजांनी जाणीवपुर्वक कोणाचे शिष्यत्व पत्करले नाही. तसेच जाणीवपुर्वक कोणास आपले शिष्यही मानले नाही. त्यांच्या प्रभावळीतील कोणालाच त्यांनी प्रत्यक्ष गुरूपदेश दिल्याची साक्ष मिळत नाही. उलट प्रभावळीतील काही कवींनी त्यांना आपले गुरू मानलेले आहे. संत बहिनाबाई, संत निळोबाराय आदींना तुकारामांनी स्वप्नसदृश्य अवस्थेत अनुग्रह दिल्याची आपल्या अभंगातुन नोंद करुन ठेवली आहे.

तुकारामांच्या सहवासात नित्य वावरणाऱ्या चौदा वैष्णवांचा उल्लेख महिपतीबुवा ताहाराबादकर यांनी त्यांच्या तुकाराम चरित्रात केला आहे तो असा...

"असे इकडे देहू ग्रामात जाण  तुका पावला वैकुंठ भुवन।
ते स्थळी वैष्णव चौदा जण। निश्चय धरुनी बैसले।

[illegible] यांचा उल्लेख आला आहे त्यामध्ये रामेश्वर भट, तुकयाबंधु कान्होबा, संताजी जगनाडे इ. चा उल्लेख केला आहे.

तुकोबांच्या प्रभावळीत त्यांना समकालीन असणाऱ्या व्यक्ती यामध्ये रामेश्वर भट वाघोलीकर, कान्होबा, संताजी तेली जगनाडे, भागूबाई, संत बहिणाबाई तर तुकोबांच्या नंतर कचेश्वर व्रम्हे, निळोबा इत्यादींचा समावेश होतो.

१. रामेश्वर भट वाघोलीकर-संत तुकारामारांच्या जीवनातील दखलपात्र म्हणुन आलेले संत होय. यांच्याविषयी डॉ. वि. ल. भावे म्हणतात 'आधी निंदा करुन मगाहुन तुकाराम महाजांचा एकनिष्ठ भक्त झालेला रामेश्वर हा ग्रंथकार म्हणून प्रसिध्दीस आल्याचे दिसत नाही. गाथ्यातुन रामेश्वर भटाच्या नावावर अवघे पाच अभंग आढळतात. यावरून रामेश्वर भटांची कल्पना आपणास येते. रामेश्वर भट यांची वारकरी संप्रदायात खरी ओळख आहे. ती म्हणजे संत तुकाराम महाराजांची आरती त्यांनी रचल्यामुळे वारकरी संप्रदायात त्यांना खुप महत्वाचे स्थान आहे. संत तुकाराम महाराजांची 'आरती तुकारामा स्वामी सदगुरू धामा।' ही प्रसिध्द आरती आज ही घराघरात भक्तिभावाने म्हटली जाते.

२. तुकयाबंधु कान्होबा- संत तुकारामांच्या प्रभावळीतील



ID. No. PU/AN/A/ 58/1999
PRINCIPAL
Savitribai College of Arts
Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar

दुसरे समकालीन व वारकरी संप्रदायात महत्वाचे स्थान असणारे त्यांचे बंधु कान्होबा होय. "ज्ञानेश्वरांच्या गाथ्यात जसे त्यांच्या भावंडांच्या अभंगाचा समावेश केला जातो, त्याचप्रमाणे तुकारामांच्या अभंगविश्वाशी एकरुप होण्याचे भाग्य तुकाराम बंधु कान्होबा यांच्या अभंगवाणीला लाभलेले आहे. कान्होबा तुकारामांच्या आध्यात्मिक जीवनाशी समरस होऊन गेले आणि त्यांनी तुकारामांचे शिष्यत्व पत्करले. कान्होबाची रचना 'तुकयाबंधुची' म्हणून अकारलेली आहे.तुकाराम तात्या यांनी संपादित केलेल्या गाथ्यात कान्होबांच्या नावावर सत्यान्नव अभंग दिले आहे तर 'सकलसंतगाथे'त पन्नास अभंग व आरत्या आढळतात. त्यांचे नाटांचे अभंग प्रसिध्द आहेत तसेच आत्मनिवेदनपर अभंग, गौळणी आणि विठ्ठलाशी केलेले भांडणाचे अभंग प्रसिध्द आहेत. संत तुकारामांच्या अभंगवाणीतच कान्होबांचे अभंग आल्यामुळे त्यांना खुप महत्व आहे.

३. संताजी तेली जगनाडे- संत तुकाराम महाराजांचे समकालीन तसेच महाराजांच्यावर एकनिष्ठ भक्ती असणारे व तुकाराम महाराजांच्या वाणीला शब्दरुप देणारे असा अनेक अभ्यासकांनी त्यांचा उल्लेख केलेला आहे. संत तुकोबांच्या प्रभावळीत संताजींना माणाचे स्थान आहे. कारण महाराजांचे अभंगवाणी लेखन त्यांनी केलेले आहे व तुकारामांचे एकनिष्ठ सेवक व शिष्य म्हणुन वारकरी संप्रदायात त्यांना महत्वाचे स्थान आहे. त्यांच्या नावावर फक्त 'घाण्याचे अभंग' ही एकच रुपकात्मक काव्यनिर्मीती आहे. त्यांच्या रचनेवर संत तुकारामांचा प्रभाव पडलेला दिसतो. संताजींनी आपल्या रचनेमधुन आपला अध्यात्मिक अनुभव व्यक्त करताना रुपकाचा आश्रय घेतला आहे व आपल्या काव्यामधुन व्यवसायिक परिभाषा वापरताना दिसतात. त्यांचा एक-एक अभंग म्हणजे एक-एक रुपक आहे. त्यामध्ये त्यांनी एक-एक 'लोकबंध' सांगितला आहे.

४. संत तुकाराम कन्या भागूबाई- तुकाराम कन्या भागूबाई ही तुकारामांच्या निर्याणाच्यावेळी लहान होती. त्यामुळे तुकारामांच्या अलौकिक व्यक्तिमत्वाच्या संस्कारांचा लाभ भागूबाईला होऊ शकला नाही. भागूबाईंनी काही काव्यरचना केली असावी असे तुकारातात्या संपादित 'श्री. तुकाराम बाबांचे बंधु कान्होबा, मुलगी भागूबाई आणि शिष्य निळोबा यांच्या अभंगांची गाथा' या ग्रथावरुन समजते. त्यांच्या नावावर फक्त दोन अभंग आहेत. या दोन्ही अभंगापैकी पहिल्या अभंगामधुन विठ्ठल भेटीची ओढ व तुकारामांच्या निर्याणाचे दुःख व्यक्त होते.

"मी हे अपराधी मोठी। मज घालावे या पा[illegible]।
मी तान्हुली अजान। म्हणु का देवु नये स्तन।
भागु म्हणे विठोबासी। मज धरावे पोटासी।

तर दुसऱ्या अभंगामधुन साधुसंतांच्या जीवनात [illegible] होईल हे सांगताना

"साधुचा संग धरी रे। श्रीहरी स्मरणी रंगली वाणी।
किर्तनारंगी होसी अभंगी। भागु बघ तुज नमन करी रे।

यावरुन त्यांच्यावर सुद्धा संत तुकारामाचा प्रभाव होत हे स्पष्ट दिसते.

५. संत बहिणाबाई- वारकरी सांप्रदायात संत बहिणाबाईंचे स्थान अत्यंत महत्वाचे आहे. वारकरी सांप्रदायाची परंपरा सांगणारा त्यांचा अभंग "संतकृपा झाली। इमारत फळा आली।" या अभंगाचा उल्लेख केल्याशिवाय पुढे जाताच येत नाही. या अभंगामधुन वारकरी सांप्रदायाचा संपुर्ण इतिहास सांगितला आहे. एका ब्राम्हण कुटुंबात जन्माला येऊनही संत तुकाराम महाराजांच्या अलौकिक ज्ञानाचा प्रभाव त्यांच्यावर पडला आणि त्यांनी संत तुकाराम महाराजांना स्वप्नवत गुरु मानले. त्यांनी याचे प्रकटीकरण आपल्या अभंगामधुन सांगितले आहे.

"तुकाराम रुपे येवोनी प्रत्य। म्हणे पुर्वपक्ष सांभाळी जे।
ठेवोनिया कर मस्तकी बोलिला। मंत्र सांगितला कर्णरंध्री।

यावरुन संत तुकाराम महाराजांनी स्वप्नवत गुरु उपदेश केल्याची साक्ष मिळते. नंतर संत तुकारामांची प्रत्येक्ष भेट झाल्यावर त्यांनी आपली काव्यरचना केलेली दिसते. आपल रचनेमधुन त्यांनी आत्मनिवेदनावर निर्याणपर, भक्तिवर, तुकारामांची आरती, पंदरीमहात्म्य इ. अनेक विषयावर काव्यरचना करणारी स्त्री म्हणुन वारकरी सांप्रदायात त्यांचा गौरव केला जातो.

६. संत कचेश्वर ब्रम्हे- कचेश्वरांचे जीवन पहाता 'आदिकथानुसंधान' या नावाने त्यांचे आत्मचरीत्र प्रसिद्ध आहे. ते पुर्वीपासुन हरिभक्त होतेच. तुकारामांचा स्वप्नरूप साक्षात्कार त्यांच्या जीवनात घडला. आणि त्या साक्षात्काराची घटना घडल्यावर एक संत म्हणुन कचेश्वर पुढे आले. कचेश्वरांनी आपल्या जीवनातील प्रमुख घटना व प्रसंग यांचे धावते वर्णन 'आदी' या आत्मवृत्तात केले आहे. याचा उल्लेख डॉ. सदानंद मोरे यांच्या 'तुकाराम दर्शन'



ID. No. PU/AN/A/ 58/1999
PRINCIPAL
Savitribai College of Arts
Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar

या ग्रंथामधुन सविस्तर आला आहे. ते म्हणतात, "नारायण महाराज हे जसे निळोबांचे मार्गदर्शक होते तसेच ते कचेश्वरांचेही मार्गदर्शक ठरतात" यावरुन त्यांचे महत्त्व लक्षात येते. तसेच कचेश्वर यांनी 'सुदामचरीत्र' आणि 'गजेंद्रमोक्ष' ही प्रसिद्ध अख्यानकाव्यांची निर्मीती केली. संत तुकारामांची काव्यशैली व कचेश्वरांची काव्यशैली जरी वेगळी असली तरीही संत तुकारामांच्या प्रभावळीत कचेश्वरांचा समावेश केला जातो. कारण कचेश्वरांनी स्वतः प्रभावित होऊन स्वप्नवत संत तुकारामांना गुरु माणले होते हे त्यांनी 'आदी 'मधुन सांगितले आहे.

७. संत निळोबाराय पिंपळनेरकरः- संत निळोबाराय हे वारकरी सांप्रदायातील शेवटचे संत होय. संत तुकाराम महाराजांच्या निर्याणानंतरही त्यांचा वारसा घेऊन मोठ्या प्रमाणात अभंगरचना करुन वारकरी संप्रदायात स्वतःचे एक आगळे वेगळे स्थान निर्माण करणारे संतकवी म्हणुन निळोबारायांची ख्याती आहे. प्रपंचाविषयी विरक्ती आल्यानंतर ते वारकरी सांप्रदायाकडे वळले. पंढरपुरची वारी करत असताना तुकारामांविषयी वारकऱ्यांच्या मनातील भक्तिभाव पाहुन ते प्रभावित झाले. पुढे नारायण महाराजांकडुन तुकाराम महाराजांची ख्याती ऐकली आणि तुकारामांच्या भक्तिभावाचा छंद जडला आणि नंतर भक्ती आणि अखंड चिंतनाने तुकाराम महाराजांचा त्यांना स्वप्न साक्षात्कार आणि तुकारामांना त्यांनी आपले गुरु मानले. त्यांचा वारसा घेऊन मोठ्या प्रमाणात काव्यरचना केली. त्यांनी त्यांच्या अभंगवानीतुन सर्वच संतांच्या कार्याचा गुणगौरव केला आहे. त्यांनी बाळक्रिडा व श्रीकृष्ण चरीत्र, देवाविषयीचे अभंग, देव व भक्त यांच्यातील संवाद, संत तुकाराम विषयक अभंग, विठ्ठल महात्म्य, विरहिणी, गौळणी व काही कुट रचनेमधुन तत्कालिन समाजातील लोकबंध आले आहेत.

संत तुकाराम महाराजांच्या प्रभावळीतील संतांचे स्थान व महत्व पहाता संत तुकारामांप्रमाणेच त्यांच्या प्रभावळीने प्रत्यक्ष गुरुपदेश घेतलेला दिसत नाही. संत तुकाराम महाराजांकडुन स्वतःहुन स्वप्नवत गुरु केल्याचे दिसते. तसेच संत तुकाराम महाराजाप्रमाणे समाजात (संसारात) नैराश्य आल्यामुळे वारकरी संप्रादयाचे तत्वज्ञान व आचारधर्म स्विकारुन समाज प्रबोधनाचे काम केलेले आहे. हे काम त्यांनी संत तुकाराम महाराजांच्या निर्याणानंतरही चालुच ठेवले. संत नोळोबाराय यांनी वारकरी संप्रादयाची परंपरा पुढे चालु ठेवली तर संत कान्होबांनोअभंग दिले. रामेश्वर भट यांनी संत तुकाराम महाराजांची प्रसिद्ध आरती दिली, कचेश्वर ब्रम्हे यांनी आख्यान काव्याची परंपरा चालु केली. संत बहिणाबाई यांनी 'संतकृपा झाली इमारत फळा आली। हा प्रसिद्ध अभंग देऊन आत्मचरित्र लिहीणारी पहिली स्त्री म्हणुन मान मिळवला. संताजी तेली जगनाडे यांनी घाण्याचे अभंग मधुन एक-एक रुपकामधुन एक-एक दाखला दिला.

या सर्व संतांच्या प्रभावळीत संतांचा चमत्कार, अद्भुतता यावर विश्वास वाटतो. आणि हे सर्व काल आणि आज अभंगाद्वारे आपल्या रचनेमधुन लोकांपर्यंत पोहर्चविण्याचे कार्य या प्रभावळीतील संतांनी केले. त्यामुळे संत तुकाराम महाराज व त्यांच्या प्रभावळीतील संतांचे विचार आजही आधुनिक काळातील लोकांना उपकारक आहेत.

**संदर्भ ग्रंथ-**


१) ताहारावादकर महिपती बुवा- भक्तीलिलामृत.

२) मराठी वाडःमय इतिहास-खंड दुसरा स.ग. भालसे, महाराष्ट्र साहित्य परिषद, टिळक रस्ता-पुणे.

३) भावे वि. ल. महाराष्ट्र सारस्वत खंड-२ पुरवणी डॉ. तुळपुळे शं.गो. तुकारामांचे शिष्यमंडळ-पॉप्युलर प्रकाशन मुंबई-१९८३

४) घोलप शोभा- संत तुकारामांचा शिष्यपरिवार, प्रतिमा प्रकाशन पुणे.

५) भावे ह. अ. बहिणाबाईंचा गाथा, वरदा प्रकाशन, पुणे.


❑❑❑


आंतरराष्ट्रीय बहुभाषिक शोध पत्रिका
प्रिंटिंग एरिया

PRINCIPAL
Savitribai College of Arts
Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar